महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ६९ वा | दिनांक : ०९/१२/२०२४ | वार : सोमवार

## शंभूराज देसाईंचा सुषमा अंधारेंवर अब्रु नुकसानीचा दावा





**सातारा :** पुण्यातील एफसी रोडवरील नामांकित हॉटेलमध्ये मुलं ड्रग्जची नशा करतानाचा व्हिडिओ जून महिन्यात समोर आला होता. त्यावरून सुषमा अंधारेंनी तत्कालिन उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाईंवर हप्तेबाजीचा आरोप करत राजीमान्याची मागणी केली होती. याप्रकरणी देसाईंनी पाटण न्यायालयात अंधारेंवर अब्रू नुकसानीचा दावा दाखल केला आहे. त्या केसमध्ये सुषमा अंधारे शनिवारी (७ डिसेंबर) न्यायालयात हजर झाल्या.

पुण्यात ड्रग्जचा साठा सापडला होता. त्यानंतर पोर्शे कार अपघातातील संशयित अल्पवयीन मुलाने मित्रांसोबत दारूची पार्टी केल्याचा व्हिडिओ समोर आला होता. यावरून हॉटेल , पबमध्ये अल्पवयीन मुलांना दारू दिली जाते. महिन्याला तीन कोटींचा हप्ता गोळा होतो. तो हप्ता शंभूराज देसाईंना जातो, असा खळबळजनक आरोप रवींद्र धंगेकरांनी केला होता. तसेच पैसे घेऊन अनाधिकृत व्यवसायांना बळ दिलं जात असल्याचा आरोप करत सुषमा अंधारेंनी शंभूराज देसाईंच्या राजीनाम्याची मागणी केली होती.

शंभूराज देसाई महायुती सरकारमध्ये उत्पादन शुल्क मंत्री असताना पुण्यात ड्रग्जची प्रकरणे उघडकीस आली होती. त्यावरून काँग्रेसचे तत्कालिन आमदार रवींद्र धंगेकर आणि शिवसेना (उबाठा गट) नेत्या सुषमा अंधारेंनी देसाईंवर गंभीर आरोप केले होते. त्यानंतर देसाईंनी अब्रू नुकसानीचा दावा दाखल करणार असल्याचा इशारा दिला होता. यासंदर्भात सातारा जिल्ह्यातील पाटण न्यायालयात दाखल केलेल्या अब्रू नुकसानीच्या दाव्यात हजर राहण्याचं समन्स न्यायालयाने अंधारेंना बजावलं होतं. त्यानुसार त्या शनिवारी न्यायालयात हजर झाल्या.

विधानसभा निवडणूक निकालावर बोलताना सुषमा अंधारे म्हणाल्या की, बॅलेटवर निवडणुका होतात तेव्हा भाजपा बॅकफूटवर जातो आणि ईव्हीएमवर निवडणूक झाली की भाजपा जिंकतो. राज्यात स्थापन झालेलं सरकार हे जनमतांच्या आशिर्वादाने नव्हे तर ईव्हीएमच्या कृपेनं आलेलं सरकार आहे. या सरकारने मतांची चोरी केली असल्याचा आरोप यावेळी अंधारेंनी केला.

अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर दोनच दिवसात आयकर विभाग त्यांना क्लीनचीट देऊन १ हजार कोटींची मालमत्ता पुन्हा सुपूर्द करतो. याचा अर्थ लोकशाही बळकट करण्यासाठी अजितदादांनी केलेल्या खडतर लढ्याला यश मिळालं, असंच म्हणावं लागेल, असा टोलाही अंधारेंनी लगावला.

## बेळगावात मराठी भाषकांच्या मेळाव्याला विरोध

**बेळगाव :** बेळगाव शहरात सोमवारी मराठी भाषकांच्या महामेळावा आयोजित करण्यात आला आहे. मात्र, याला कर्नाटक पोलिसांनी बंदी घातली आहे. बेळगाव शहरात ज्या पाच ठिकाणी पार पडण्याची शक्यता आहे त्या सर्व ठिकाणी जमावबंदीचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच जमावबंदीचे उल्लंघन केल्यास कडक कारवाई देखील केली जाणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

बेळगाव शहरात सोमवारपासूनच विधानसौध या ठिकाणी कर्नाटक सरकारच्या हिवाळी अधिवेशनाला सुरुवात होणार आहे. तसेच याच दिवशी मराठी भाषकांचा महामेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा महाराष्ट्र एकीकरण समितीने आयोजित केला आहे. जिथे जिथे मेळावा आयोजित करण्यात आला आहे तिथे जमावबंदी लावण्यात आली आहे. तसेच याचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाईचा इशारा दिलेला असूनही महामेळावा घेणारच असा निर्धार महाराष्ट्र एकीकरण समितीचे कार्याध्यक्ष माजी आमदार मनोहर किणेकर यांनी केला आहे.

महाराष्ट्र एकीकरण समितीचा महामेळावा बेळगाव येथील संभाजी चौक येथे सोमवारी सकाळी ११ वाजता होणार आहे. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी शहरातील धर्मवीर संभाजी चौक, छत्रपती संभाजी उद्यान, छत्रपती शिवाजी महाराज उद्यान, लेले ग्राउंड, व्हॅक्सिन डेपो अशा पाच ठिकाणी जमाव बंदीचा आदेश लागू केला आहे. या ठिकाणी पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येण्यावर बंदी घातली आहे.

एकीकरण समितीचे नेते आर.एम.चौगुले यावर प्रतिक्रिया देताना म्हणाले की, महाराष्ट्रात जाण्यासाठी आम्ही आंदोलन करत आहोत. महाराष्ट्रात गेल्यावरच हे आंदोलन बंद होईल. यापूर्वी देखील अनेकदा पोलिस खात्याने दबाव तंत्र वापरून आंदोलनाला आडकाठी आणण्याचा प्रयत्न केला. पण त्याला मराठी माणसाने दाद दिली नाही. कोणत्याही परिस्थितीत सोमवारी आम्ही महामेळावा करणारच.

महाराष्ट्रातील नेत्यांना देखील बेळगाव येथे जाण्यास बंदी असल्याची माहिती समोर आली आहे. या मेळाव्यासाठी कोल्हापूर येथून मोठ्या संख्येने शिवसैनिक जाणार असल्याचे बोलले जात आहे. मात्र कर्नाटक पोलिस यांना सीमेवरच अडवण्याची शक्यता आहे. त्यामुळे सोमवारी आता नेमके काय होणार याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.

## शरद पवार लोकशाही मानत नाहीत : गोपीचंद पडळकर





**सोलापूर :** शरद पवार लोकशाही मानत नाहीत. जे नातेवाईक निवडून आले ते ईव्हीएम घोटल्याने निवडून आलेत का? असे म्हणत भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर हल्लाबोल केला आहे. शरद पवार यांनी मरकडवाडीला भेट दिली, त्यानंतर गोपीचंद पडळकर यांनी पवारांवर टीका केली आहे.

गोपीचंद पडळकर म्हणाले, हम करे सो कायदा यासारखे शरद पवार वागत आहेत. शरद पवार लोकशाही मानत नाहीत. जे नातेवाईक निवडून आले ते ईव्हीएम घोटाळ्याने निवडून आलेत का? हे आता ईव्हीएमच्या नावाने बोंबा मारत आहेत. अशी टीका गोपीचंद पडळकर यांनी केली आहे.

शरद पवार यांनी सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील मारकडवाडी या गावाला भेट दिली आहे. ईव्हीएममधून झालेल्या मतदानावर शंका उपस्थित करत माळशिरस विधानसभा मतदारसंघातील मारकडवाडी गावाने मतपत्रिकेवर मतदान घेण्याचा निर्णय घेतला होता. मात्र प्रशासनाच्या विरोधामुळे मतदानाचा प्रयोग बंद पडला. याच ठिकाणी शरद पवार यांनी आज भेट दिली आहे.

यावेळी सभेत बोलताना शरद पवार म्हणाले, देशाचे अनेक खासदार मला भेटतात, ते एकच चर्चा करतात ती फक्त तुमच्या गावाची. मला विचारतात की हे गाव कुठे आहे? संपूर्ण देशाच्या जे लक्षात आले नाही ते या गावकऱ्यांच्या कसे लक्षात आले? तुमच्या सगळ्यांचे अभिनंदन संपूर्ण देश करत आहे, याचाच आम्हा सर्वांना आनंद होत आहे.

## अक्षरक्रांती आंतरराष्ट्रीय साहित्य संमेलनात मुख्य अतिथी म्हणून सन्मानित होणार



**संभाजीनगर (विशेष प्रतिनिधी)** :- विख्यात कवी, समीक्षक, ज्येष्ठ पत्रकार डी. बी. जगत्पुरिया हे नागपूर येथे २८ व २९ डिसेंबरला होणाऱ्या अक्षरक्रांती आंतरराष्ट्रीय साहित्य संमेलनात मुख्य अतिथी म्हणून सन्मानित होणार आहेत. कथाकार सुरेश पाचकवडे संमेलनाचे अध्यक्ष आहेत. कन्हेरे फाउंडेशनचे मा. किशोर कन्हेरे उद्घाटक आहेत.

९७ व्या अखिल भारतीय संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. रवीन्द्र शोभणे व टोकियो, जपान येथील प्रसिद्ध कादंबरीकार, उर्मिला देवेन हे विशेष अतिथी म्हणून सहभागी होणार आहेत. सदर संमेलन, महात्मा फुले शिक्षण संस्था, रेशीमबाग, नागपूर येथे होणार आहे.

डी. बी. जगत्पुरिया यांच्या नावावर मराठी, हिन्दी कविता संग्रह, सत्त्वसार, मूल्याक्ष, दस्तऐवज असे पाच समीक्षा ग्रंथ सामाजिक वैचारिक गंध, दौलत हा कथा संग्रह, नाटक, एकांकिका असे लेखन प्रकाशित आहे. दरवर्षी महाराष्ट्रातील सुमारे २५ ते ३० दिवाळी अंकात त्यांचे लेखन प्रकाशित होते.

अनेक राज्यस्तरीय पुरस्कारांसह त्यांच्या नावे सात राष्ट्रीय पुरस्कार आहेत.अस्मितादर्श, अंकुर साहित्य संमेलनांसह काही संमेलनांचे अध्यक्ष, उद्घाटक, परिसंवादाचे अध्यक्ष व वक्ते म्हणून त्यांनी सहभाग नोंदवला आहे.

यवतमाळ येथे झालेल्या आगळ्या-वेगळ्या जागर साहित्य संमेलनात ते प्रमुख परिसंवादाचे अध्यक्ष होते. कवी संमेलन शिखरावर नेणारे सूत्रसंचालक म्हणून त्यांनी ख्याती अर्जित केली आहे.

त्यांचे सर्वश्री डॉ. श्रीपाल सबनीस, डॉ युवराज सोनटक्के, डॉ. गजानन सोनुने, डॉ. विनोद सिनकर, डॉ. प्रकाश नाईक, डॉ. प्रा. डी. व्ही. पाटील, जगदीश देवपूरकर इत्यादी अनेकांनी अभिनंदन केले आहे.

## पंकजा मुंडेंनी घेतली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट



**मुंबई :** भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. यावेळी मराठवाड्यातून होणाऱ्या स्थलांतरावर पंकजा मुंडे यांनी चर्चा केली. याबद्दलची माहिती पंकजा मुंडे यांनी त्यांच्या सोशल मीडियावर शेअर केली आहे. यावेळी पंकजा मुंडे यांनी मराठवाड्यातील दुष्काळावर देखील चर्चा केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत भेट घेतल्यावर पंकजा मुंडे यांनी ट्विट करत याबद्दल माहिती दिली आहे. पंकजा मुंडे म्हणाल्या, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मी अभिनंदन केले. तसेच यावेळी मराठवाड्याच्या मुद्द्यांवर, विशेषतः दुष्काळ निर्मूलन आणि काही भागातील बेरोजगारी सोडवण्याच्या मुद्द्यावर चर्चा केली. महाराष्ट्रातील आर्थिकदृष्ट्या मागास भाग आणि बीडमधील स्थलांतरित कामगारांच्या समस्यांकडे विशेष लक्ष देण्याचे आश्वासन यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी दिले असल्याची माहिती पंकजा मुंडे यांनी दिली आहे.

## मराठी माध्यमाच्या मुलांमध्ये गुणवत्ता - प्रा. दाभाडे



**औराळा :** शाळेतील मुले शिक्षकांसाठी विद्यार्थी आहेत, पण तीच मुले तुमच्या घराचे भविष्य आहेत. शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांसाठी नेहमीच दहा पावले पुढे टाकत असतो. पालकांनीही पुढाकार घेण्याची गरज आहे. आपली मराठी माध्यमाची मुले कुठेच कमी नाहीत. त्यांच्यात खुप गुणवत्ता आहे. फक्त पालकांकडून त्यांना ताकद कमी पडते, असा विश्वास प्राचार्य सोमकांत दाभाडे यांनी शनिवारी व्यक्त केला. कन्नड तालुक्यातील औराळा येथील स्वर्गीय बाबुरावजी औराळकर न्यू हायस्कूल उच्च माध्यमिक विद्यालयात शनिवारी पालक-शिक्षक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

पुढे बोलताना दाभाडे म्हणाले की, मराठी शाळा चालवणे आता खूप अवघड झाले . मराठी माध्यमातील मुलांचे पालक सगळ्या जबाबदाऱ्या शाळेवर ढकलून मोकळे होतात. परंतु मराठी शाळा तुमच्या-आमच्यासाठी लेकरांच्या शिक्षणासाठीच्या शाळा आहेत हे पालक विसरत चालले आहेत. या मराठी शाळा वाचल्या तरच गरिबांची लेकरे शिक्षण घेऊ शकतील. म्हणून मराठी शाळा वाचवण्याची प्रत्येक पालकाची जबाबदारी आहे. खासगी शाळेत आपण लाखो रुपये फीस भरून मुलांना शाळेत पाठवतो. मग मुलांसाठी आपण शाळेचा आणि खेळाचा गणवेश का घेऊ शकत नाही, अशी खंत दाभाडे यांनी व्यक्त केली.

जितेंद्र बिरारी यांनी सूत्रसंचालन केले तर नलावडे यांनी आभार मानले. या वेळी शालेय समितीचे अध्यक्ष चंद्रकांत देशमुख, पंढरीनाथ निकम, अप्पासाहेब भोजने, सरपंच विठ्ठल गुजराणे, यज्ञेश्वर आंबे, प्रशांत पगारे, वाल्मीक खैरनार व पालक, शिक्षक उपस्थित होते.

अश्रू अनावर प्रसिद्ध कवी ज्ञानेश्वर गायके, लक्ष्मण वाल्डे, सुरेश औटे यांनी "काळ्या भुईत पेरणी, माझा शेतकरी बाप, कन्नडच्या भूमीत"", लक्ष्मण वाल्डे यांनी "शिकवा शाळा तुम्हा मिळे मान रे","शाळा आमची फुलांचा बगिचा, छोटी-छोटी मुले, शाळेचे मैदान फुलांनी सजवूया"", राखी जैस्वाल, रोहिणी राठोड या दोन विद्यार्थिनींनी "बाप-लेकीचे नाते"" या शीर्षकावर आधारित कविता सादर करताना विद्यार्थिनींसह उपस्थित पालकांनाही अश्रू अनावर झाले.

## मराठा कुणबीसाठी मोफत संगणक प्रशिक्षण डिप्लोमा प्रमाणपत्रांचे वितरण



**कन्नड (अरुण थोरात):** सारथी संस्थेमार्फत आयोजित कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी एमकेसीएलच्या निवडक केंद्रावर मोफत संगणक व व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षण दिले जात आहे. या अंतर्गत नुकताच प्रमाणपत्र वितरणाचा कार्यक्रम आरंभ कंप्युटर्स कन्नड येथे संपन्न झाला.

प्रास्ताविक संचालक रामेश्वर मोरे यांनी तर सूत्रसंचालन रोहिणी मोरे यांनी केले. या प्रसंगी प्रा. हेमकांत पाटील यांनी या उपक्रमाचे कौतुक करून संयम, सातत्य, सकारात्मक दृष्टिकोन आणि कौशल्य याचे महत्व विशद केले.

तंत्रशिक्षण महाविद्यालयाचे उपप्राचार्य मतसागर यांनी विद्यार्थ्यांना आपल्यातील असलेला स्पार्क कायम जिवंत ठेवायला हवा आणि तो ओळखून आपल्याला आवड असलेल्या क्षेत्रात कौशल्य विकासाच्या माध्यमातून तो सहज साध्य आहे असे सांगितले.

कन्या माध्यमिक विद्यालयाचे विजय भोसले यांनी आपल्या भाषणात आपल्या ध्येयासाठी आपण अक्षरशः पागल होऊन मेहनत घ्यायला हवी सोबतच व्यक्तीमत्व विकास हा आयुष्यातील महत्वाचा भाग असुन त्याशिवाय आयुष्य संपन्न होत नाही. आणि ते या कोर्समध्ये शिकायला मिळते ही अतिशय चांगली बाब असल्याचे नमूद केले.

रानकवी अरुण थोरात यांनी ही आपले मनोगत व्यक्त केले. छत्रपती संभाजी महाराज सारथी युवा व्यक्तिमत्त्व विकास व संगणक कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र राज्य नॉलेज कॉर्पोरेशन पुणे या प्रशिक्षण संस्थेमार्फत संपूर्ण महाराष्ट्रात तालुकास्तरापर्यंत कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम सारथी संस्थेमार्फत आयोजित करण्यात आला आहे.

सहा महिन्यांच्या या डिप्लोमा अभ्यासक्रमासाठी मोफत प्रवेश दिला जात असून कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत लक्ष गटाच्या १८ ते ४५ या वयोगटातील उमेदवाराकरिता सारथी संस्थेमार्फत सहा महिन्यांचे निःशुल्क व्यक्तिमत्त्व संगणक कौशल्य विकास प्रशिक्षण घेण्यासाठी पात्र उमेदवाराकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत असल्याची माहिती संचालिका रोहिणी मोरे यांनी दिली.

याप्रसंगी स्वामी प्रणवानंद सरस्वती हायस्कूल, कालिमठ चे मुख्याध्यापक हेमकांत पाटील, रानकवी अरुण थोरात, आरंभ कॉम्प्युटर्स चे संचालक रामेश्वर मोरे, शिक्षक कृष्णा मगर सह विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०९ डिसेंबर २०२४


# तुमच्याच गावात तुम्हालाच जमावबंदी, हा कुठला कायदा? शरद पवार



**सोलापूर :** लोकसभा, राज्यसभेत आम्ही पाहतोय की अनेक खासदार आम्हांला भेटतात आणि तुमच्या गावाची चर्चा करतात. सगळे खासदार आम्हाला विचारतात की हे गाव आहे कुठे. त्यामुळे गावाचे अभिनंदन आहे. ईव्हीएमबाबत लोकांच्या मनात काही शंका निर्माण का झाली. तुमच्याच गावात तुम्हालाच जमावबंदी, हा कुठला कायदा?; मारकडवाडीमध्ये शरद पवारांचा उपस्थित केला सवाल.

शरद पवार म्हणाले की, मारकडवाडीच्या आंदोलनामुळे EVM विरोधात देश पेटत आहे. तुम्हा सर्व ग्रामस्थाचे याबद्दल मी अभिनंदन करतो. निवडणुकीसंदर्भात लोकांच्या मनात शंका निर्माण झाली आहे. निकालच असे आलेत की लोकांच्या मनात शंका निर्माण झाल्या आहेत. ग्रामस्थांना मतदानाच्या आकडेवारीवर शंका आहे. अमेरिकेसारख्या मोठ्या देशात बॅलेट पेपरवर मतदान होते, अनेक देशांनी EVM चा त्याग केला आहे.

शरद पवार म्हणाले की, काही निकालावर शंका व्यक्त केली जात आहे. निवडणूक प्रक्रियेबद्दल लोकांमध्ये शंका निर्माण झाली आहे. ह्या निवडणूक पद्धतीमध्ये बदल करण्याची गरज आहे. या निवडणुकीत काही तक्रारी येतात, कुठे पराभव होतो हे होत आहे. पण संपूर्ण राज्यात याबद्दल शंका निर्माण झाली आहे. काही निकाल असे आले की जनतेच्या मनात शंका निर्माण झाली पाहिजे.

शरद पवार म्हणाले की, जगातील मोठा देश अमेरिका आहे. अमेरिकेत मत मतपेटीत टाकलं जातं. दुसरा मोठा देश इंग्लंड. तिथेही मत मतपेटीत टाकले जाते. यूरोप खंडातील सर्व देश आपल्या सारखे ईव्हीएमवर जात नाही. अमेरिका आणि काही देशांनी ईव्हीएमचा निर्णय घेतला. पण नंतर त्यांनी बदलला. जग असं आहे. तर भारतातच का. आपल्याकडे संख्या आली. लोक अस्वस्थ आहेत. आत आपणही ही निवडणूक पद्धतीमध्ये बदल केला पाहिजे.

उत्तम जानकर पुढे बोलताना म्हणाले की, निवडणूक आयोगाकडून पत्र घेणार असून येत्या दोन दिवसात मी आमदारकीचा राजीनामा देणार आहे, असे जानकर यांनी मराठी वृत्त वाहिनीसोबत बोलताना म्हटले आहे. तर बॅलेट पेपरवर पोटनिवडणूक निवडणूक घ्या, असे विनंती जानकर आयोगाला करणार आहेत. आयोगाने परवानगी दिली नाही, तर सुप्रिम कोर्टात जाणार असल्याचेही जानकरांनी म्हटले आहे.

उत्तम जानकर म्हणाले की, आमच्यावर प्रशासनाने दबाव वाढवला तेव्हा आदल्या दिवशी रात्री गावामध्ये लोकं मंडपात झोपले होते. सकाळी मतदानाच्या दिवशी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. राहुल गांधी यांनी याबाबत माहिती घ्यायला गावात प्रतिनिधी पाठवले होते. माझ्या शपथेपेक्षा येथील लढाई महत्त्वाची आहे. मी राजीनामा देतो, बॅलेट पेपरवर मतदान घ्या.

दुसरीकडे परिसरातील महायुती समर्थकांनी मारकडवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व माजी आमदार राम सातपुतेंच्या फोटोंसह फलक लावले आहेत. सातपुतेंनी पवारांना उद्देशून 'येताय तर मी केलेली विकासकामे पाहून जा,' असा उपरोधिक चिमटा समाजमाध्यमांवरून घेतला आहे. त्याला पवार रविवारी काय उत्तर देणार याची उत्सुकता अनेकांना लागली आहे. कदमवाडी रस्त्यालगतच्या ग्रामपंचायत कार्यालयासमोर ज्या ठिकाणी मतदान होणार होते तेथे मविआच्या कार्यकर्त्यांनी साफसफाई करून मंडप, मंच उभारला आहे.

शरद पवार हे मारकडवाडीला भेट देणार असल्याच्या पार्श्वभूमीवर रविवारी सायंकाळी ५ वाजता भाजप नेते गिरीश महाजनही मारकडवाडीत येणार असल्याचे माजी आमदार राम सातपुतेंच्या कार्यकर्त्यांकडून सांगण्यात येत आहे. मात्र त्यास सातपुतेंनी दुजोरा दिलेला नाही. त्यामुळे आता महाजन येतात का? याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, मारकडवाडी येथील प्रकरण हे देशपातळीवरही चांगलेच गाजत असल्याचे दिसून येत आहे.

## हिंगोलीत ईव्हीएम हटाव स्वाक्षरी मोहीम




**हिंगोली :** राज्यात ईव्हीएम हटावो देश बचाओ मोहीम काँग्रेसच्या वतीने सुरु करण्यात आली असून हिंगोलीत रविवारी ता. ८ या मोहिमेला मोठा प्रतिसाद मिळाला असून एकाच दिवसांत ८०० पेक्षा अधिक नागरीकांनी स्वाक्षऱ्या करून ईव्हीएम हटावोची मागणी केली आहे. पुढील काळात ही मोहिम आणखी तिव्र केली जाणार असल्याची माहिती काँग्रेसचे पदाधिकारी तथा माजी नगरसेवक अनिल नेनवाणी यांनी दिली आहे.

याबाबत नेनवाणी यांनी सांगितले की, राज्यात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत ईव्हीएम मशीनचा मोठा घोटाळा झाला आहे. सत्ताधाऱ्यांच्या विरोधात जनमत असतांनाही त्यांना मिळालेले बहूमत संशोधनाचा विषय आहे. सदर प्रकार ईव्हीएमच्या घोटाळ्यामुळेच झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे. ईव्हीएम घोटाळ्याबाबत सर्वस्तरावरून आरोप होत असतांना निवडणुक आयोग तसेच महायुतीचे नेते या विषयावर बोलण्यास तयार नाहीत. त्यामुळे कुठे तरी पाणी मुरतंय असे चित्र दिसू लागले आहे.

राज्यात आगामी सर्व निवडणुका बॅलेट पेपरवर घ्याव्यात या मागणीसाठी काँग्रेसच्या वतीने स्वाक्षरी मोहिम हाती घेण्यात आली आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या आदेशानुसार हिंगोली जिल्ह्यातही आज हि मोहिम राबविण्यात आली आहे.

हिंगोली जिल्ह्यातील महात्मा गांधी चौकात ईव्हीएमच्या विरोधात घोषणाबाजी करून त्यानंतर स्वाक्षरी मोहिमेला सुरवात करण्यात आली. दिवसभरात तब्बल ८०० पेक्षा अधिक नागरीकांनी स्वाक्षऱ्या करून ईव्हीएम हटावला पाठिंबा दर्शविला आहे. पुढील काळात हिंगोली जिल्ह्यात हि मोहिम आणखी तिव्र केली जाणार असल्याचे नेनवाणी यांनी स्पष्ट केले.

## घरा बाहेर पडल्या शिवाय प्रगती साधता येत नाही : तहसीलदार विद्याचरण कडवकर



**कन्नड (अरुण थोरात):** कन्नड शहरातील संगणक प्रशिक्षणात अग्रेसर संस्था जयकाली काम्पुटर टायपिंग इन्स्टिट्यूट च्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार विद्याचरण कडवकर हे होते.

तर प्रमुख पाहुणे म्हणून साई इम्पॅक्ट अकॅडमीचे संचालक किसन काकरवाल, संस्थेचे अध्यक्ष डॉ. यशवंत पवार प्राचार्या अनिता पवार उपस्थित होते, कार्यक्रमाची सुरुवात भारताचे आराध्य दैवत छत्रपती शिवराय यांचे प्रतिमापूजन आणि दिप प्रज्वलनाने करण्यात आली. या वेळी तहसिलदार विद्याचरण कडवकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधतांना म्हणाले की, जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर शालेय शिक्षणासोबत व्यावहारिक शिक्षण घेणे गरजेचे आहे. नोकऱ्या नाहीत हा गैरसमज आहे.

कारण समाजात अनेक कामासाठी माणसे मिळत नाहीत. म्हणून कुठल्याही कामाची लाज न बाळगता घराबाहेर पडा, तुमचे कामच तुम्हाला उच्च पातळीवर घेऊन जाईल, घर सोडा, गाव सोडा प्रगती निश्चित आहे. घरात बसले तर अधोगती आणि बाहेर पडले तर प्रगतीचा प्रवास सुरू होतो. त्यासाठी वाचन वाढवा, मनन करा ,चिंतन करा ,कष्ट करा, कष्टात देव आहे.

पुढे ते म्हणाले की मान- अपमान याची चिंता करू नका, अपमान पचविण्याची ताकद ठेवा, अपमानाने ईर्षा निर्माण होते. अशी व्यक्ती जीवनात नक्कीच काहीही करून यशस्वी होते. अपमानाला अपमान न समजता प्रगतीकडे नेणारी एनर्जी टॅबलेट समजा. ज्ञानाचा सागर फार मोठा आहे, त्यासाठी बाहेर पडावे लागेल, तुम्ही घेत असलेले कॉम्प्युटर आणि टायपिंग याचे ज्ञान प्रत्येक क्षेत्रात उपयोगी पडणार आहे.

त्यामुळे छत्रपती संभाजीनगर, पुणे, मुंबई, बंगलोर आणि विदेशातही रोजगाराच्या संधी उपलब्ध असल्याचे सांगून जीवनाचे तत्त्वज्ञान विशद केले. जयकाली काॅम्प्युटरचे हे छोटेसे रोपटे भविष्यात वृटवक्ष होवो अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या. प्रास्तविकात संस्थेचे अध्यक्ष डॉ.यशवंत पवार म्हणाले की, संस्थेत फक्त कॉम्प्युटर आणि टायपिंग याचेच प्रशिक्षण न देता व्यक्तिमत्व विकास , स्टेज डेरिंग, इंटरव्यू टेक्निक, कृत्रिम बुद्धिमत्ता, चाट जी पी टी यांचेही प्रशिक्षण दिले जाते.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे किसन काकरवाल म्हणाले की, आर्मी,नेव्ही, पोलीस अशा कोणत्याही क्षेत्रात नोकरी करताना टायपिंगचे प्रशिक्षण गरजेचे आहे. अशाच युवकांना नोकरीत मानाचे स्थान मिळते, यासाठी मेहनत घेतली तर जीवन आनंदी होईल आणि यश मिळेल. याप्रसंगी बाळू दाभाडे, सुप्रिया साळुंखे, पृथ्वीराज चव्हाण, आरती खंडागळे, रविता जाधव, रेखा धुमाळ यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

मान्यवरांच्या हस्ते कॉम्प्युटर टायपिंग परिक्षेत यशस्वी झालेल्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र, सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन श्रावणी करवंदे आणि शिवानी ढोणे यांनी केले तर आभार प्रदर्शन चैतन्य माडवी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नरेश सोनवणे, ऋषिकेश शिवदे, अजय चव्हाण, रितेश राठोड, पृथ्वीराज चव्हाण, आकाश इमले, शुभम वाघ, दीपक मोरे यांनी परिश्रम घेतले